पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, २ रा मजला, वैद्यकिय विभाग, मुंबई-पुणे हायवे लगत,
पिंपरी- ४११ ०१८

---

**राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यु, चिकुनगुन्या डास नियंत्रण, पर्यावरण व्यवस्थापनाकरीता ब्रिडींग चेकर्स पदे भरणेबाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यु, चिकुनगुन्या डास नियंत्रण, पर्यावरण व्यवस्थापनाकरीता ब्रिडींग चेकर्स या अभिनामाची पदे (Daily Wages) तात्पुरत्या स्वरूपात ०२ (दोन) महिना कालावधीसाठी खालीलप्रमाणे भरावयाची आहेत. याकामी खालीलप्रमाणे नमुद केलेल्या पदांकरिता शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नांव | रुग्णालय झोन | रिक्त पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | ब्रिडींग चेकर्स | आकुर्डी रुग्णालय | ८ |
| २ | | यमुनानगर रुग्णालय | ७ |
| ३ | | भोसरी रुग्णालय | ९ |
| ४ | | वाय.सी.एम.रुग्णालय | ५ |
| ५ | | सांगवी रुग्णालय | ५ |
| ६ | | तालेरा रुग्णालय | ७ |
| ७ | | जिजामाता रुग्णालय | ७ |
| ८ | | थेरगांव रुग्णालय | ८ |
| | | एकुण- | ५६ |

**ब्रिडींग चेकर्स या पदाची शैक्षणिक अर्हता व वय खालील प्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| शैक्षणिक अर्हता | या पदासाठी उमेदवारांची शैक्षणिक अर्हता किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| वय | किमान १८ वर्षे ते कमाल ४३ वर्षे |

**अटी व शर्ती-**

१) **इच्छुक उमेदवारांनी दि.३/०७/२०२४ ते दि.११/०७/२०२४ रोजी (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी- १०.०० ते सायंकाळी- ५.०० वाजेपर्यंत वैद्यकीय विभाग, दुसरा मजला, आवक-जावक कक्ष, पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, पिंपरी- ४११ ०१८ येथे वरील विहित मुदतीत समक्ष येऊन अर्ज सादर करावा. वरील कालावधीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

२) इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करताना अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) पदवी/पदवीका प्रमाणपत्र ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ४) शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र ७) निवासी पुरावा ८) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटो या सह पिंपरी चिंचवड महानगरपालिका संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वरील आमच्या बद्दल ➡ नोकरी विषयी या सदरामध्ये जाऊन अर्जाची प्रिंन्ट काढून सदरचा अर्ज परिपुर्ण भरुन सादर करावयाचा आहे.

३) सदरची पदे राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राहतील, सदर पदांचा पिंपरी चिंचवड म.न.पा.आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही. तसेच सदर पदाचे काम केलेल्या कोणाचाही अनुभव शासकीय नोकरीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही. तसेच सदर पदाचा कोणत्याही परिस्थितीमध्ये आ.कर्मचारी (पु) या पदाच्या भरतीसाठी आवश्यक असणा-या ९० दिवसांच्या कामाकजाचा अनुभव म्हणुन ग्राहय धरला जाणार नाही किंवा या बाबत उमेदवाराने केलेला कोणताही दावा मान्य केला जाणार नाही.

४) सदरची पदे पुर्णपणे केवळ राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची असल्याने अर्जदारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही. ज्या दिवशी सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय त्यांची सेवा समाप्त केली जाईल.

५) सदरच्या पदांवरील नेमणूका या अत्यंत हंगामी स्वरुपाच्या असून उमेदवाराला कायमस्वरुपी हक्क सांगता येणार नाही असे हमीपत्र १०० रुपयांच्या स्टॅम्पवरती नोटरीव्दारे प्रमाणित करुन नियुक्ती वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

६) सदरच्या पदावरील कर्मचारी यांनी महिन्यातून किमान २५ दिवस काम करणे आवश्यक आहे.

७) सदरच्या पदावरील कर्मचा-यांच्या नेमणूका या २९ दिवसांकरिता आहेत त्यामुळे प्रत्येक २९ दिवसानंतर या कर्मचा-यांच्या सेवेमध्ये ०१ दिवसाचा खंड करुन त्यांना परत २९ दिवसांचे आदेश देण्यात येवुन त्यांचा एकुण सेवा कालावधी फक्त ०२ (दोन) महिन्यांचा असेल.

८) सदर पदावरील कर्मचा-यांना दररोज र.रु.४५०/- प्रमाणे काम केलेल्या दिवसांचे (Daily Wages) मानधन अदा करण्यात येईल.

९) सदर पदावरील कर्मचा-यांना वेतन देताना त्यांनी एका महिन्यांमध्ये साधारण २५ दिवस काम केले असल्यास २५X४५० रु. असे रु.११,२५०/- असे एका महिन्याचे मानधन काढण्यात येईल.

१०) सदर पदावरील कर्मचा-यांच्या हजेरीचा तसेच कामकाजाचा आढावा पर्यवेक्षकामार्फत घेऊन मगच त्यांचे मानधन अदा करण्यात येईल.

११) सदर जाहिरातीमधील पदसंख्येमध्ये बदल होऊ शकतो.

१२) मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचेकडीलक्र.राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/पदभरती १०६७०-११०१६/२०२३ दि.२७/०४/२०२३ अन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध पदांच्या पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना प्राप्त असून यामध्ये उमेवारांना खालील प्रमाणे गुण देण्यात येतील.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० % प्रमाणे proportion = ६० * ५० / १०० = ३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घेतली जाईल) | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त B.Sc. (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc. (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २० % प्रमाणे proportion = ६० * २० / १०० = १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत.( १ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | **एकूण १०० गुण** |

१३) सदर पदासाठी फक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रहिवासी असलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाईल. इतर अर्जाचा विचार केला जाणार नाही त्यामुळे उमेदवारांनी रहिवासी पुरावा (आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, रेशनिंगकार्ड छायांकित सत्यप्रत) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील

१४) सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगित करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१५) प्रस्तुतचे जाहिरातीमधील पदाकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना जाहिराती सोबत महापालिका संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदरचा अर्ज उपलब्ध करुन घेऊन उमेदवाराने सादर करणे अपेक्षीत आहे. याकरिता महापालिकेमार्फत स्वतंत्रपणे अर्ज उपलब्ध करुन दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१६) सदर जाहिरातीच्या अनुषंगाने गुणानुक्रम यादी तसेच अंतिम निवड यादी, नेमणूक आदेश, महापालिकेच्या संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वर प्रसिध्द केले जातील ते संबंधीत उमेदवारांनी उपलब्ध करुन घेऊन मुदतीत वैद्यकिय विभाग मुख्य कार्यालय पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८ येथे रुजू व्हावयाचे आहे. याकरीता कोणत्याही उमेदवारास स्वंतत्रपणे पत्रव्यवहार, दुरध्वनी, मोबाईल अथवा एस.एम.एस.व्दारे संपर्क करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सही/-

**(शेखर सिंह)**

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी- ४११ ०१८

जाहिरात क्रमांक - ४०

दिनांक- ०३/०७/२०२४

# <u>उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना</u>

फोटो

**प्रति,**

**मा. आयुक्त.**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**विषय – <u>ब्रिडींग चेकर्स</u> या पदासाठी अर्ज**
**संदर्भ – जाहिरात क्रमांक- ४० दि. ०३ - ०७ -२०२४**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीनुसार मी मनपाचे रुग्णालयामध्येतात्पुरत्या स्वरुपात Daily wages पध्दतीने **<u>ब्रिडींग चेकर्स</u>** या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे:

| अ.क्र. | तपशील | माहिती | | |
|---|---|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव | **आडनाव** | **नाव** | **वडील / पतीचे नाव** |
| २ | पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता | | | |
| ३ | ई-मेल | | मोबाईल क्र. | |
| ४ | जन्मतारीख | | | |
| ५ | लिंग | पुरुष | स्त्री | |
| ६ | सद्यस्थितीत महापालिकेत कामकाज करीत आहे काय | | होय / नाही | |
| | होय असल्यास | रुग्णालय/दवाखान्याचे नाव - | पदनाम - | |
| ७ | **अर्ज करावयाचा रुग्णालय झोन नांव-** | | | |
| ८ | **शैक्षणिक अर्हतेचा तपशील** | | | |

| **शैक्षणिक अर्हता** | **उत्तीर्ण वर्ष** | **मिळालेले गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १० वी | | | |
| १२ वी | | | |
| पदवी | | | |
| पदविका | | | |
| पदवित्तर पदवी | | | |
| इतर कोर्स | | | |
| इतर कोर्स | | | |
| इतर कोर्स | | | |

९ **अनुभव तपशील-**

| **अ.क्र.** | **संस्थेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक** | **संस्थेचा प्रकार(शासकीय/ निमशासकीय/खाजगी)** | **काम केलेल्या पदाचे नांव** | **कालावधी (वर्ष-महिने-दिवस)** |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

१०) आपणांविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय?

चौकटीमध्ये √ अशी खुण करावी.

| होय | नाही |
| --- | --- |
| | |

होय असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.

--------------------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------------------

११) अर्जासोबत खालील (छायांकीत) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) ..............................................................................

२) ................................................................................

३)..................................................................................

४)...................................................................................

५).......................................................................................

१२) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय? होय / नाही

सदरची पदे ही तात्पुरत्या स्वरुपातील तात्पुरत्या स्वरुपात Daily wages नेमणुकीची असून २.५ महिन्यांकरीताच्या नेमणुकीची आहेत याची मला जाणीव असून याबाबत मी भविष्यात कोठेही व कोणताही दावा दाखल करणार नाही. वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती, तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी / चूकीची अथवा अपुरी असल्याचे आढळून आल्यास नेमणुकिच्या कोणत्याही टप्प्यावर या माहितीच्या आधारे महापालिका सेवेतून कमी करण्यास तसेच या भरतीकरीताच्या अपात्रतेस मी स्वत: जबाबदार राहिल. याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई देखील केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळ - ------------------** **अर्जदाराची सही -**

**दि. / /२०२४** **अर्जदाराचे नाव ------------------------------------**

**(उमेदवाराने अर्जासोबत सर्व शैक्षणिक अर्हता, अनुभव अर्हता प्रमाणपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती जोडाव्यात)**

........................................................ **फक्त कार्यालयीन कामकाजाकरिता**.....................................................

शैक्षणिक अर्हता कागदपत्र पूर्तता:१० वी ☐ १२वी ☐ पदवी ☐ पदविका ☐ पदवीत्तर पदवी ☐

अनुभव अर्हता कागदपत्र पूर्तता : होय ☐ नाही ☐

वय पात्रता: होय ☐ नाही ☐

अर्ज पात्र: पात्र ☐ अपात्र ☐

अपात्र असल्यास कारण:-

.......................................................................................................................................

.......................................................................................................................................

तपासणी अधिका-याचे नांव:- ........................................................ पदनाम:-..................................................

तपासणी अधिका-याची स्वाक्षरी व दिनांक: